विशेष संपादकीय

आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । गुरुवार, ३ फेब्रुवारी २०२२ । वर्ष : ४ आपले वृत्तपत्र, आपला आवाज अंक : १३ । पाने : ६ । मूल्य २ ₹



## शतायुषी व्हा!

बीड जिल्ह्याच्या सहकार आणि राजकीय पटलावर चंद्रकांत शेजुळ यांचे नाव नव्या फळीत अग्रक्रमाने घेतले जाते. एवढ्या कमी वयात तुळजाभवानी अर्बनला यशोशिखरावर नेण्याचे काम चंद्रकांत शेजुळ यांनी लिलया पेलले आहे. तुळजाभवानीच्या प्रगतीशील वाटचालीत त्यांची कल्पकता आणि स्वतःला पूर्णतः झोकून देण्याची क्षमता कारणीभूत आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. केवळ सहकारच नाही तर सर्वच क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करण्यात ते यशस्वी झालेले आहेत. राजकारणातही त्यांनी युवा नेते म्हणून प्रभावी छाप निर्माण केलेली आहे. आबेगावचे सरपंच ते पात्रुड जिल्हा परिषद गटाचे सदस्य अशी राजकीय कारकीर्द लक्षवेधी ठरलेली आहे. बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील नव्या फळीतील नेतृत्व म्हणून अतिशय अल्पावधीत त्यांनी जनमाणसांवर गारूड केले आहे. बँकेच्या माध्यमातून येणाऱ्या सामान्य माणसांना आपण काय मदत करू शकतो, हे तुळजाभवानी अर्बनचे कर्मचारी सामाजिक बांधिलकीतून कार्यरत असतात. कर्मचाऱ्यांवर निश्चित प्रभाव आहे. प्रत्येक घटकांना आपल्या सोबत आणि सामावून घेण्याची तयारी चंद्रकांत शेजुळ यांच्याकडे आहे. जनसामान्यांबद्दल कणव असलेल्या चंद्रकांत शेजुळ यांना सामाजिक आणि राजकीय पटलावर दैदिप्यमान यश मिळो. याच वाढदिवसाच्या शुभेच्छा!

**बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील नव्या फळीतील नेतृत्व म्हणून अतिशय अल्पावधीत त्यांनी जनमाणसांवर गारूड केले आहे. बँकेच्या माध्यमातून येणाऱ्या सामान्य माणसांना आपण काय मदत करू शकतो, हे तुळजाभवानी अर्बनचे कर्मचारी सामाजिक बांधिलकीतून कार्यरत असतात.**

: संपादक

# सहकार क्षेत्रात सुंदरराव सोळंके यांचे अमुल्य योगदान

## चंद्रकांत शेजुळ यांचे विशेष मुलाखतीत प्रतिपादन



माजलगाव : सहकार क्षेत्रात महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र लोकनेते सुंदरराव सोळंके यांचे सहकार क्षेत्राला उर्जितावस्था देण्यासाठी अमूल्य योगदान आहे. सुंदरराव सोळंके यांच्या दूरदृष्टीमुळेच बीड जिल्ह्यात आणि माजलगाव मतदारसंघात सहकार क्षेत्राला बहर आला, अशी माहिती जिल्हा परिषद सदस्य तथा तुळजाभवानी अर्बनचे सर्वेसर्वा चंद्रकांत शेजुळ यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.

चंद्रकांत शेजुळ यांनी आपल्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या विशेष मुलाखतीत विविध मुद्यांवर चर्चा केली. आपली कौटुंबिक पार्श्वभूमी काय यावर बोलताना चंद्रकांत शेजुळ म्हणाले, मी माजलगाव तालुक्यातील आबेगाव येथील रहिवाशी सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म झाला. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती. वडील शेती करायचे. माझे प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागात झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी माजलगावी यावे लागले. ही झाली माझी कौटुंबिक पार्श्वभूमी.

सहकार क्षेत्राकडे कसे वळलात यावर बोलताना चंद्रकांत शेजुळ म्हणाले, माजलगावात बी.कॉम नंतर जी.डी.सी. ॲण्ड ए. हा सहकार क्षेत्रातील लेखापरीक्षकाचा कोर्स करत असताना मंगलनाथ पतसंस्थेत लिपीक पदावर काम करण्याची संधी मिळाली. एकीकडे नोकरी आणि दुसरीकडे महाविद्यालयीन शिक्षण सुरू होते. अशा दोन्हीही पातळ्यांवर काम सुरू असताना सहकार क्षेत्र आणि बँकिंग क्षेत्राविषयी आवड निर्माण झाली. सहकारातील बाळकडू मंगलनाथ पतसंस्थेने दिले. 'मंगलनाथ'च्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा पुढे तुळजाभवानी अर्बनच्या उभारणीत फायदा झाला.

तुळजाभवानी अर्बनची उभारणी कधी झाली, या प्रश्नावर दिलखुलासपणे बोलताना चंद्रकांत शेजुळ म्हणाले, सन २००६ साली तुळजाभवानी अर्बनची मुहूर्तमेढ रोवली. खरे तर सहकार क्षेत्र सर्व घटकांना सामावून घेणारे क्षेत्र आहे. गरजवंतांना सर्वोतोपरी मदत करण्याचे मोठे माध्यम बँकिंग क्षेत्र असल्याने आपण इतरांना मदत करू शकतो. मोठा आधार देवू शकतो. याच उदात्त हेतूने तुळजाभवानी अर्बन उदयास आली. गरजवंतांना विविध व्यवसायासाठी कर्ज, ठेवीदारांना आकर्षक व्याज देवून प्रत्येक घटकांना संस्थेच्या प्रगतीत सामावून घेण्याचे काम केले. आजपर्यंत एक लाखाहून अधिक सभासदांना थेट लाभ देण्याचे महत्त्वपूर्ण काम हे संस्थेवरील दृढ विश्वासाच्या जोरावरच झाले आहे. असे अभिमानाने सांगावेसे वाटते, असेही शेजुळ म्हणाले.

### 'तरूणांनी अगोदर स्वावलंबी व्हावे'

राजकारणातील तरूणांच्या सहभागाबद्दल बोलताना चंद्रकांत शेजुळ म्हणाले, आजच्या तरूणाने अगोदर उद्योग, व्यवसायाच्या माध्यमातून सक्षम व्हावे आणि त्यानंतरच राजकारणात यावे. राजकारणाला वयाची अट नसते म्हणून सक्षम झाल्यास कधीही राजकारण करू शकता. आर्थिक सक्षमता काळाची गरज असून तरूणांनी भरकटत न जाता आपल्या स्वतःच्या पायावर उभे रहावे, असे आवाहनही चंद्रकांत शेजुळ यांनी केले.



**वर्तमान इंटरव्ह्यू**

**बाबा श्रीहरी देशमाने**

आज तुळजाभवानी अर्बनने सहकार क्षेत्रात नवा मानदंड निर्माण केला आहे. आता संस्थेचे आगामी ध्येय काय आहे, यावर बोलताना चंद्रकांत शेजुळ म्हणाले, येणाऱ्या दहा वर्षात १० हजार कोटींचा व्यवसाय करावयाचा आहे. तब्बल एक हजार कर्मचाऱ्यांना संस्थेत नोकरी देणे, हे प्राधान्यक्रमाने पाहिले जाईल, असेही शेजुळ म्हणाले.

सहकार क्षेत्र माजलगाव मतदारसंघात बहरले याचे रहस्य काय? यावर बोलताना शेजुळ यांनी सांगितले, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र लोकनेते सुंदरराव सोळंके यांच्या दूरदृष्टीमुळे जिल्ह्यात आणि मतदारसंघात सहकार क्षेत्र बहरले. सुंदरराव सोळंके यांनी सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देण्यासाठी अनेक प्रकल्प सुरू केले. त्यात माजलगाव सहकारी साखर कारखान्याचेही मोठे योगदान आहे. एकंदरीत माजलगाव मतदारसंघात सहकार क्षेत्राला उर्जितावस्था देण्यासाठी सुंदररावजी सोळंके यांच्यासह गोविंदराव डक, मोहनराव सोळंके, राधाकृष्ण होके पाटील, बाजीराव जगताप, आर.टी.देशमुख आणि विद्यमान आमदार प्रकाश सोळंके या राजकीय धुरिणांनी सहकार क्षेत्र रूजविण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न केले, हे नाकारता येत नाही. खऱ्या अर्थाने या राजकीय मंडळींनी माजलगाव मतदारसंघात सहकार क्षेत्राला बहर आणण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. या सर्व राजकारण्यांच्या प्रयत्नांमुळेच माजलगावात सहकाराला पोषक वातावरण तयार झाले. त्याचे फलित म्हणून आज माजलगावात बँकिंग क्षेत्र प्रगतीपथावर आहे.

राष्ट्रवादी पक्षच का निवडला? यावर चंद्रकांत शेजुळ यांनी सांगितले की, माझ्या राजकारणाची सुरूवात आबेगाव ग्रामपंचायतीपासून झाली. पहिल्या टर्म मध्येच सरपंच पद मिळाले. खऱ्या अर्थाने येथूनच माझ्या राजकीय कारकीर्दीला प्रारंभ झाला. या मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांच्या खंबीर नेतृत्वाखाली राष्ट्रवादीत आलो. पुढे जिल्हा मध्यवर्ती बँकेत संचालक झालो. बीड जिल्हा परिषद निवडणुकीत सदस्य म्हणून निवडून आलो. विकासाची जाण असलेले कुशल नेतृत्व म्हणून प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू आहे.

# चंद्रकांत शेजुळ : सामान्य माणसांचा आवाज

बीड जिल्ह्यातील राजकीय क्षेत्रात चंद्रकांत शेजुळ यांचे व्यक्तिमत्त्व सर्व घटकांना बरोबर घेवून जाणारे पुढे येत आहे. त्यांचे एकंदरीत कार्य इतरांसाठी निश्चित प्रेरणादायी आहे. माजलगावस्थित तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचा वैभवशाली डोलारा फुलविण्यात संस्थापक चंद्रकांत शेजुळ यांचा हातखंडा राहिला आहे. तुळजाभवानी अर्बन म्हणजे चंद्रकांत शेजुळ असे जणू समीकरण झाले आहे. सहकार क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करून राजकीय पटलावरही चंद्रकांत शेजुळ सक्रीय झाले आहेत. आमदार प्रकाश सोळंके यांचे विश्वासू सहकारी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतही त्यांनी अल्पावधीत वेगळे स्थान निर्माण केले आहे. मिनी मंत्रालय अर्थात जिल्हा परिषदेतही त्यांनी वेगळा ठसा उमटविला आहे. प्रतिष्ठेच्या पात्रुड जिल्हा परिषद सर्कलमधून तत्कालीन आमदार आर.टी.देशमुख यांचे चिरंजीव रोहित देशमुख यांचा पराभव करून शेजुळ जिल्हा परिषदेची पायरी चढले. आज त्यांच्याकडे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालकपद आहे. कोणत्याही पदाला न्याय दिला पाहिजे, या हेतूने चंद्रकांत शेजुळ कार्यरत असतात. सहकार, राजकीय क्षेत्राबरोबरच उद्योग, शेतीमध्येही त्यांनी वेगवेगळे प्रयोग करून आपले अष्टपैलू व्यक्तीमत्व सिध्द केले आहे.

**तुळजाभवानीने राबवलेले उपक्रम जनसामान्यांच्या कल्याणासाठी उपयुक्त ठरलेले आहेत. अंडरग्राऊंड लॉकर सिस्टीम कार्यान्वित करणारी तुळजाभवानी अर्बन राज्यातील पहिली मल्टीस्टेट ठरली आहे. या नव्या अफलातून प्रयोगाचे चंद्रकांत शेजुळ हे जनक ठरले आहेत. दुष्काळात शेतकऱ्यांच्या मदतीला चंद्रकांत शेजुळ धावून गेलेले आहेत.**

तुळजाभवानी अर्बन आज राज्यातील काही काही बोटावर मोजण्याइतपत मल्टीस्टेटमध्ये अव्वल आहे. तुळजाभवानीने राबवलेले उपक्रम जनसामान्यांच्या कल्याणासाठी उपयुक्त ठरलेले आहेत. अंडरग्राऊंड लॉकर सिस्टीम कार्यान्वित करणारी तुळजाभवानी अर्बन राज्यातील पहिली मल्टीस्टेट ठरली आहे. या नव्या अफलातून प्रयोगाचे चंद्रकांत शेजुळ हे जनक ठरले आहेत. दुष्काळात शेतकऱ्यांच्या मदतीला चंद्रकांत शेजुळ धावून गेलेले आहेत. माजलगाव तहसिल कार्यालयास वॉटर फिल्टर, सामुदायिक विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी भरीव मदत, कोरोना मुख्यमंत्री सहाय्यता निधीला तब्बल अकरा लाख रूपयांचा निधी, लॉकडाऊन काळात पोलिस कर्मचाऱ्यांना अन्नदान, असे एक नव्हे अनेक उपक्रम राबविण्यात चंद्रकांत शेजुळ यांची सामाजिक बांधिलकी असते. प्रत्येक घटकांसाठी आपण काहीतरी देणे लागतो, याच भावनेतून चंद्रकांत शेजुळ सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असतात.



**माजलगाव मतदारसंघात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, उद्योग, राजकारण आणि सहकार क्षेत्रात राष्ट्रवादीचे युवा नेते तथा बीड जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत शेजुळ यांनी अल्पावधीत आपले वेगळेपण कामातून सिद्ध केले आहे. सहकाराच्या पलिकडे आणि राजकारणाच्या पलिकडे चंद्रकांत शेजुळ हे सामान्य माणसांच्या हाकेला धावून जाणारे नेतृत्व आहे. त्यांनी सामान्य माणसांच्या कल्याणासाठी भरघोस कामे केली आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त 'वर्तमान'ने त्यांच्या एकंदरीत कार्याची घेतलेली दखल.**



**वर्तमान स्पेशल**

**भगीरथ तोडकरी**

यंदाचा तुळजाभवानी अर्बनचा वर्धापनदिन मोफत आरोग्य व उपचार शिबिर घेवून साजरा करण्यात आला. शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांना तुळजाभवानी अर्बन समुहात नोकरी देवून शेजुळ यांनी सामाजिक दायित्व स्वीकारले आहे. यासाठी त्यांचा विविध पुरस्कार देवून वेळोवेळी सन्मान झालेला आहे. घार फिरे आकाशी, चित्त तिचे पिलेपाशी या ओळींप्रमाणे चंद्रकांत शेजुळ यांचे आहे. आज त्यांचा महाराष्ट्रभर नावलौकिक झाला असला तरी जन्मगाव आबेगाव बद्दल त्यांची मोठी आत्मीयता दिसते. आबेगाव शाळेसाठी भरीव निधी आणून विकास केला. समाजाचे आपण काहीतरी देणेकरी लागतो. अगदी याच भावनेतून आपले काम सुरू आहे. ते अविरतपणे सुरूच राहील, असे चंद्रकांत शेजुळ यांनी वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला 'वर्तमान'शी बोलताना सांगितले.





# संपादकीय

## कुशल मनुष्यबळाचा वाणवा

आज सगळीकडे स्पर्धा वाढली आहे. बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. अशा परिस्थितीत कुशल कर्मचारी, अधिकाऱ्यांचाच तुटवडा आहे. असा भाग नाही तर एकंदरीतच कुशल मनुष्यबळाचा वाणवा भासत आहे. आयएएस किंवा भा.प्र.से. म्हणजे भारतीय प्रशासकीय सेवा सध्या ठळक बातम्यांमध्ये झळकत आहे. याचे कारण आहे, आयएएस अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीविषयीच्या नियमांमध्ये केंद्र सरकारकडून आलेल्या प्रस्तावित सुधारणांना पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्यांसह अन्य राज्यांनी घेतलेले गंभीर आक्षेप. प्रभावशाली प्रशासनासाठी आणि सहकारात्मक संघ राज्यवादाचा भाव जपण्यासाठी, या नियमांत कोणतेही मोठे बदल करण्यापूर्वी राज्यांशी सल्लामसलत करण्याची प्रक्रिया पार पाडली पाहिजे. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची भरती, नेमणूक व त्यांचे प्रशिक्षण हे केंद्र सरकारद्वारे केले जाते आणि त्यांना विविध राज्यांच्या कॅडरमध्ये नियुक्त केले जाते. त्यानंतर संबंधित राज्य कॅडरमध्ये काम करण्याबरोबरच, केंद्र सरकारने पाचारण केल्यास तेथेही सेवा देणे त्यांना बंधनकारक असते. केंद्र सरकारमधील उपसचिव/संचालक स्तरापासून ते सचिव स्तरापर्यंतची वरिष्ठ पदे, केंद्र सरकारकडून विविध राज्य कॅडरमध्ये प्रतिनियुक्त झालेल्या भारतीय प्रशासन सेवेमधील अधिकाऱ्यांनी तसेच, अन्य सेवांतील अधिकाऱ्यांनी आणि त्या त्या क्षेत्रातील ज्ञानी व्यक्तींनी भरणे अपेक्षित आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांवर दुहेरी नियंत्रण असते, एक म्हणजे त्यांच्या कॅडरशी संबंधित राज्य सरकारचे आणि दुसरे म्हणजे त्यांना नियुक्त करणाऱ्या केंद्र सरकारचे. भारतीय प्रशासकीय सेवेची योजना आणि रचना करताना केंद्र आणि राज्ये अशा दोघांनाही सत्ता आणि अधिकार यांचा वापर करत, या अधिकाऱ्यांची सेवा उपयोगात आणावी आणि देशाचे प्रशासन प्रभावी रीतीने चालवावे, असा यामागील उद्देश आहे. या अधिकाऱ्यांच्या पदनियुक्ती, बदली, शिस्तभंगाची कारवाई अशा सेवा-स्थितींविषयी अंतिम अधिकार केंद्र सरकारला असतात. तथापि या निर्णयप्रक्रियेमध्ये राज्य सरकारांनाही उचित नियमांच्या आधारे सहभागी होता येते. म्हणूनच, आयएएस कॅडरच्या नियमांत केंद्र सरकारने सुचवलेल्या बदलांकडे, आपल्याकडील सहकारात्मक संघराज्य राजकीय रचनेमध्ये केंद्र आणि राज्य सरकारांची रचना व कार्ये लक्षात घेऊनच त्या संदर्भाने पाहिले पाहिजे. प्रसारमाध्यमांतील वृत्तांकनानुसार आयएएस कॅडर नियमांमध्ये बदल करण्याच्या प्रस्तावासंबंधी ५ आणि १२ जानेवारीची दोन पत्रे केंद्र सरकारने तयार केली. पहिल्या पत्रात ठेवलेला प्रस्ताव असे सांगतो, प्रतिनियुक्तीसाठी राखीव ठेवलेल्या कोट्यापैकी विविध स्तरांवरील पात्र अधिकारी प्रत्येक राज्य सरकार केंद्र सरकारला उपलब्ध करून देईल. त्याची मोजदाद केंद्र आणि राज्य सरकारांनी मिळून केलेली असेल. तसे करताना जेथे सहमती होणार नाही, तेथे पहिल्याचे म्हणजे केंद्र सरकारचे मत ग्राह्य धरले जाईल. त्याखेरीज, केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन ठरावीक कालमर्यादेतच करणे राज्य सरकारवर बंधनकारक असेल, असेही यात म्हटले आहे. पाठोपाठ १२ जानेवारीच्या पत्रात आणखी पुढे जात असे म्हटले आहे की, एखाद्या राज्यातील कोणत्याही भा.प्र.से. अधिकाऱ्याला कोणत्याही केंद्रीय पदावर भरती, करवून घेऊन सेवा करण्यास निर्देश देण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. आणखी कठोरपणे या पत्रात म्हटले आहे की, केंद्र सरकारकडून नियत कालमर्यादेत राज्य सरकारने या निर्देशाकडे दुर्लक्ष केले, तर संबंधित अधिकारी केंद्र सरकार सांगेल त्या दिवसापासून त्या कॅडरमधून मुक्त झाला, असा अर्थ होईल.'' या हालचाली अचानकपणे घडून आल्या आहेत आणि असे म्हटले जात आहे की, त्या घडण्यामागे कारण आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारच्या प्रतिनियुक्तीवर जाणाऱ्या अधिकाऱ्यांच्या प्रमाणात तीव्र घसरण झाली असल्याचे एका अंदाजात म्हटले आहे. २०१४ मध्ये बंधनकारक राखीव साठ्यापैकी ६९ टक्के अधिकारी केंद्र सरकारच्या प्रतिनियुक्तीवर गेले, तर २०२१मध्ये हेच प्रमाण ३० टक्के झाले, असे त्यात म्हटले आहे. अर्थातच हा तुटवडा फार गंभीर आहे. मात्र नियमांमध्ये मोठे व मूलगामी बदल करण्याच्या प्रस्तावाऐवजी भारत सरकारने, प्रथम केंद्र सरकारमध्ये प्रतिनियुक्ती ही पूर्वीप्रमाणे लोकप्रिय का नाही, याबद्दल प्रथम आत्मपरीक्षण केले पाहिजे. तळागाळाच्या स्तरावरील प्रशासनाची जबाबदारी राज्यांकडे असते, याचेही भान भारत सरकारला असले पाहिजे. अगदी केंद्र सरकारच्या योजनांचीही अंमलबजावणी राज्य सरकारच्या माध्यमातून होते. राज्यातील अधिकाऱ्यांची केंद्राकडे तडकाफडकी बदली करण्याने राज्यातील प्रशासनाचे महत्त्व कमी होऊन मोठे नुकसान होऊ शकते. त्याखेरीज, भाजपशासित नसलेली राज्येही याला धोक्याचा इशारा समजून काहीशी सावध झाली आहेत. कारण त्यांच्या प्रशासकीय संस्थांच्या माध्यमातून-ज्याचा भा.प्र.से. हा महत्त्वाचा घटक आहे, अशा संस्थांच्या माध्यमातून राज्यांच्या अधिकारक्षेत्रात प्रशासन चालवण्याच्या घटनादत्त अधिकाराचे गंभीर उल्लंघन होत असल्यासारखे त्यांना वाटत आहे आणि काही प्रमाणात ते बरोबरही आहे. केंद्र सरकार आणि बिगर-भाजपशासित राज्ये यांच्यातील मतभेदांचे मुद्दे आणि संघर्षाची कारणे वाढत चालली असल्याच्या पार्श्वभूमीवर, प्रस्तावित सुधारणांवरील वादंग टाळता येण्यासारखा आहे. त्यामुळे केंद्र सरकारने राज्य सरकारांशी सल्लामसलत करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, हे चांगलेच आहे. यात अधिकाऱ्यांनाही समाविष्ट करून घेतल्यास या प्रक्रियेची व्याप्ती आणि विस्तार सर्वथा वाढू शकेल आणि त्यांना चांगला सल्ला मिळू शकेल. प्रत्येक क्षेत्रात कुशल मनुष्यबळाचा वाणवा भासत आहे. त्यासाठी प्रत्येकाने क्रियाशील होण्याची गरज आहे.

# विलीनीकरणाची मूठ, एसटीची माती

**एसटीच्या ५०-६० कामगारांनी आर्थिक परिस्थितीला कंटाळून आत्महत्या केल्यामुळे अडीच महिन्यांपूर्वी ऐन दिवाळीत एसटी कामगारांनी बेमुदत संप पुकारला. त्यात चीड होती, तशी उत्स्फूर्तताही होती. आता हा संप लांबत चालला, तशी त्याची तुलना १९८०-८१ च्या गिरणी कामगारांच्या संपाशी होऊ लागली. ती खोटी ठरवण्याची वेळ अजूनही गेलेली नाही.**

अडीच महिन्यांपासून सुरू असलेल्या संपामुळे एसटी महामंडळाला १,२०० कोटी रुपयांचा फटका बसल्याचं जाहीर झालंय. हा संप आता कामगार न्यायालयानेही बेकायदा ठरवलाय. संप बेकायदा ठरण्याची शक्यता असल्यामुळेच एसटी कामगारांच्या २६ युनियन आहेत, त्यांनी एकेक करत संपातून काढता पाय घेतला किंवा दूर राहणं पसंत केलं. सदाभाऊ खोत आणि गोपीचंद पडळकर हे भाजप आमदार संपाला पाठिंबा देण्यासाठी कामगारांच्या उपोषण-धरणे आंदोलनात सामील झाले होते. पण परिवहनमंत्री अनिल परब यांच्याशी झालेल्या चर्चेत संप बेकायदेशीर ठरण्याचा अंदाज आल्यामुळे त्यांनीही वेळीच काढता पाय घेतला. भाजप राज्यात विरोधी पक्ष असल्यामुळे सरकारने एसटी संप संपवण्यासाठी लक्ष घालावं, असं त्यांचे नेते बोलत आहेत. तसंही आज भाजप सरकार राज्यात असतं, तर त्याची भूमिका आजच्या महाविकास आघाडी सरकारपेक्षा वेगळी नसती. २०१७ला एसटी कामगारांच्या मान्यताप्राप्त युनियनने संप पुकारला होता. तेव्हा फडणवीस सरकारची भूमिका आजच्या ठाकरे सरकारपेक्षा वेगळी नव्हती आणि ती चुकीचीही नव्हती. कायदा-सुव्यवस्थेचं पालन करणं, हे सरकारचं कर्तव्यच आहे. जेव्हा विषय व्यापक परिणामाचा असतो, तेव्हा कमीत कमी नुकसान होईल अशा प्रकारची कारवाई सरकारला करावी लागते.



**पगारातली तफावत**

एसटी कामगारांच्या संप पुकारण्यासाठीच्या मागण्या रास्त आणि योग्य आहेत. एसटीची नोकरी ही सरकार संचलित महामंडळाची आहे. या महामंडळावर राज्य सरकारकडून संचालक आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती होते. राज्य सरकारचे कर्मचारी आणि एसटी महामंडळाचे कर्मचारी यांच्या पगारात थोडा फार फरक राहणारच. पण तो ४० ते ६० टक्के कमी असावा, हा एसटी कामगारांवर अन्याय आहे. एसटी सेवा हा नफा-तोट्यावर चालणारा व्यवसाय आहे. त्यावर कामगारांचा पगार ठरणार, हे व्यावहारिकदृष्ट्या योग्य आहे. पण अनेक सरकारी खात्यांमधे नफा-तोट्याचा विचार न करता, भरभक्कम पगार दिला जातो. सरकारकडून वेतन मिळणाऱ्या शिक्षकांचं उदाहरण घ्या. मुलांनी वर्गात दांड्या मारल्या, विद्यार्थी गळती सुरू राहिली, मुलं १०० टक्के नापास झाली, तरी त्यांना पूर्ण पगार मिळतो. या शिक्षकांची कार्यक्षमता, अपयश यावर त्यांचा पगार ठरत नाही. याउलट, सरकारनेच खाजगी प्रवासी वाहतुकीला उघड-छुपे परवाने दिल्याने एसटी प्रवासी घटले, तरीही ड्रायवर- कंडक्टरच्या पगाराला कात्री लागते. याशिवाय या व्यवसायात खरेदीतला भ्रष्टाचार, शोषण असेही मुद्दे आहेतच.

**गिरणी कामगारांच्या संपाशी तुलना**

१९५०मधे राज्यात सुरू झालेली एसटी सेवा १९९३पर्यंत फायद्यात होती. दरवर्षी शे-दोनशे कोटी रक्कम राज्याच्या तिजोरीत जमा करत होती. १९९३नंतर एसटी सेवा घाट्यात जाऊ लागली आणि खाजगी बस कंपन्या फायद्यात जाऊ लागल्या. या खाजगी बस कंपन्यांमधे एसटीचे संचालक-अधिकारी आणि त्यांच्यावर सत्तेचा वरदहस्त असलेले राजकीय नेते हस्ते-परहस्ते भागीदार असावेत, हा योगायोग नाही. त्यात एसटीला खड्ड्यात नेऊन गाडणारी निश्चित योजकता आहे. ही हरामखोरी उधळून टाकण्याचं कर्तव्य कामगार संघटनांचं होतं. पण तेही खाजगी बस कंपन्यांचे कमिशनर झाले. हा हरामखोरीचा व्यवहार आज एसटीला सरकारी सेवेत विलीन करण्यासाठी अडून राहिलेल्या कामगारांना समजत नव्हता असं समजणं बावळटपणा ठरेल. कोरोना काळात एसटी सेवा पूर्णपणे सुरू नव्हती. त्यामुळे कामगारांचा चार-पाच महिन्यांचा पगार रखडला. त्याने आधीच तुटपुंज्या पगारात काम करणाऱ्या एसटी कामगारांचा धीर सुटला. ५०-६० कामगारांनी आर्थिक ओढगस्तीला कंटाळून आत्महत्या केल्याने अडीच महिन्यांपूर्वी ऐन दिवाळीत एसटी कामगारांनी बेमुदत संप पुकारला. त्यात चीड होती, तशी उत्स्फूर्तताही होती. आता हा संप लांबत चालला, तशी त्याची तुलना १९८०-८१ च्या गिरणी कामगारांच्या संपाशी होऊ लागली. ती खोटी ठरवण्याची वेळ अजूनही गेलेली नाही.

**कॉम्रेड डांगेंचा यशस्वी संप**

गिरणी कामगारांना ८.३३ टक्के म्हणजे एक पगार बोनस मिळावा, यासाठी कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांच्या संघटनेनं १९७४मधे ४२ दिवसांचा संप घडवून आणला. त्याआधी गिरणी मालक एक-दीड ते सात-आठ टक्क्यांपर्यंत बोनस द्यायचे. १९७४ च्या संपाने गिरणी कामगारांना किमान एक पगार बोनस मिळू लागला. कॉ. डांगे यांची युनियन ही मान्यताप्राप्त संघटना नव्हती. ती मान्यता काँग्रेस धार्जिण्या राष्ट्रीय मिल मजदूर संघाकडे होती. तेव्हाही मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी होती. या आर्थिक उलाढालीत मुंबईतल्या ८० कापड गिरण्यांचा वाटा मोठा होता. तेव्हा देशात इंदिरा गांधींचं सरकार होतं. त्यांनी गिरणी कामगारांच्या संपात हस्तक्षेप केला आणि किमान ८.३३ टक्के बोनस देण्याचा कायदा करून कॉम्रेड डांगे यांनी पुकारलेला संप यशस्वी करून दिला. त्याची परतफेड कॉम्रेड डांगे यांनी इंदिरा गांधी यांनी १९७५-७७ या काळात पुकारलेल्या आणीबाणीला पाठिंबा देऊन केली. त्या बदल्यात १९८० च्या लोकसभा निवडणुकीत, तेव्हा गिरणी कामगारांची मोठ्या प्रमाणात वस्ती असणाऱ्या दक्षिण-मध्य मुंबई मतदारसंघात इंदिरा काँग्रेस'ने कॉम्रेड डांगे याच्या मुलीला- रोझा देशपांडे यांना पाठिंबा देऊन खासदार केलं.

**आज-काल**

**ज्ञानेश महाराव**

**दत्ता सामंतांची संपात एंट्री**

ऑक्टोबर १९८१मधे आठ गिरण्यांतल्या कामगारांनी अधिक बोनससाठी संप पुकारला. त्यातल्या वरळीमधल्या प्रकाश कॉटन मिलच्या कामगारांना ८.३३ ऐवजी ९ टक्के बोनस हवा होता तर प्रभादेवीमधल्या स्टँडर्ड मिलच्या कामगारांना १६ ऐवजी २० टक्के बोनस हवा होता. या आठ मिलमधल्या २५ हजार कामगारांनी तेव्हा उत्स्फूर्तपणे संप घडवून आणला, असंच चित्र तेव्हा निर्माण करण्यात आलं होतं. पण ९ टक्के बोनस आणि २० टक्के बोनस घेणाऱ्यांची उत्स्फूर्तता सारखी कशी असू शकेल? हा आठ मिलचा संप शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या गिरणी कामगार सेना'तर्फे १८ नोव्हेंबर १९८१ रोजी पुकारलेल्या एक दिवसाच्या लाक्षणिक संपा'मुळे लांबला. दरम्यान, दत्ता सामंत यांची या संपात एण्ट्री होत असल्याचं जाहीर होताच, बाळासाहेब ठाकरे यांनी आठ गिरण्यांच्या कामगारांनी कामावर जाणंच योग्य आहे,' असं सांगितलं. त्याने डॉ. दत्ता सामंत यांना गिरणी संपात आणणाऱ्यांना जोर आला. डॉ. सामंतांनी बोनसच्या संपाला वेगळं वळण दिलं.

**बोनसऐवजी मान्यतेसाठी संप**

बॉम्बे इंडस्ट्रियल रिलेशन म्हणजेच बीआयआर ॲक्ट १९४६ नुसार मान्यताप्राप्त युनियनला आपलं कायदेशीर प्रतिनिधित्व टिकवण्यासाठी २५ टक्के सभासद संख्या पुरेशी ठरायची. प्रतिस्पर्धी युनियनला मान्यता मिळवण्यासाठी ७५ टक्के सभासद संख्या आवश्यक असायची. ती ५१ टक्के असावी, अशी मागणी मान्यताप्राप्त राष्ट्रीय मिल मजदूर संघ' सोडून बाकीच्या कामगार संघटनांची असायची. आपल्या संघटनेला मान्यता मिळवण्यासाठी बोनससाठीचा लढा बाजूला ठेवू आणि आधी बीआयआर ॲक्ट रद्द करण्यासाठी बेमुदत संप करू,' अशा आणाभाका घेऊन डॉ. सामंत यांनी गिरणी कामगारांचा बेमुदत संप १८ जानेवारी १९८२ पासून सुरू केला. हा संप किमान सहा महिने चालेल असं डॉ. सामंत यांनी आधीच सांगितलं होतं. संपामुळे रोटेड-साप्ताहिक सुट्टी' पद्धतीनं ३६५ दिवस २४ तास चालणाऱ्या तीन लाख कामगारांच्या ८० गिरण्या बंद पडल्या. या कामगारांसाठी डॉ.सामंत यांच्या इतर कारखान्यातल्या कामगार संघटना पैसा गोळा करून, संपकरी गिरणी कामगारांना दरमहा धान्य पोचवत होत्या. या मदतीत त्या युनियनच्या कारखानदारांचाही पैसा असायचा. काम वेगळं असलं तरी कामगारांचा घाम सारखाच असतो. तसंच भांडवलदारांचे धंदे वेगळे असले तरी वृत्ती सारखीच असते. तशी दोस्तीही असते. या दोस्तीतून गिरणी मालकच संप लांबवण्यासाठी हस्ते-परहस्ते कामगारांना मदत पुरवत होते. कारण त्यांना संप यशस्वी होऊन द्यायचा नव्हता. त्यांना डॉ. सामंत यांचं नफ्याच्या वाट्यातलं वाढत्या वेतन-बोनसचं संकट टाळायचं होतं. पावसाळा सुरू होण्यापूर्वी संप संपावा यासाठी एस. एम. जोशी, कॉम्रेड डांगे, अहिल्या रांगणेकर, गंगाधर चिटणीस, जी. एल. रेड्डी या कामगार नेत्यांनी पुढाकार घेतला. पण डॉ. सामंत बीआयआर ॲक्ट रद्द करण्यावर अडून बसले. त्यांची ही मागणी त्यांच्या युनियनला मान्यता मिळावी यासाठी होती.

**सामंत आणि सदावर्तेंची तुलना**

कामगारांच्या दृष्टीने सगळ्या युनियन सारख्याच! सुरी सोन्याची झाली काय आणि लोखंडाची झाली काय, ती कापण्याचंच काम करणार! बीआयआर ॲक्ट रद्द करणं, हा सरकारचा विषय होता. त्यासाठी कामगारांना संपात अडकवून ठेवणं चुकीचं होतं. हे ज्यांनी डॉ. सामंत यांना ऐकवलं, ते गिरणी मालकांचे आणि सरकारचे दलाल ठरले! तेच थोड्याफार प्रमाणात आता एसटी संपात झालंय. या संपाची तुलना गिरणी कामगारांच्या संपाशी झाल्यानं एसटी कामगारांचे वकील गुणरत्न सदावर्ते यांनी सरकार आपलाही डॉक्टर सामंत करणार,' अशी बोंब ठोकली. डॉ. सामंत यांची कार्यपद्धती वादग्रस्त होती. पण ते ॲड. सदावर्ते यांच्यासारखे विदूषकी' नव्हते. विद्वान आणि उत्तम संघटक होते. राजकीय समज होती. म्हणूनच ते १९८४च्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर देशभर काँग्रेस लाट आली असताना, ते दक्षिण-मध्य मुंबईतल्या काँग्रेस पुरस्कृत उमेदवार रोझा देशपांडे यांचा पराभव करून अपक्ष खासदार' झाले. १९८५च्या विधानसभा निवडणुकीत गिरणगावातून पत्नी विनिता सामंत यांच्यासह त्यांच्या कामगार आघाडीचे तीनजण आमदार झाले. १९८९च्या लोकसभा निवडणुकीत डॉ. सामंत यांचा पराभव शिवसेनेच्या वामनराव महाडिकांनी, तर १९९१च्या निवडणुकीत मोहन रावले यांनी केला. डॉ.सामंत यांची हत्या १६ जानेवारी १९९७ रोजी झाली. दरम्यानच्या काळात तीन लाख गिरणी कामगारांची वाताहत झाली, तरी डॉ. सामंतांच्या लेखी संप सुरूच होता. विशेष म्हणजे, डॉ. सामंत यांच्या हत्येचा आणि गिरणी संपाचा सुतराम संबंध नव्हता. तसा संबंध जोडणाऱ्यांपासून एसटी कामगारांनी दूर राहिले पाहिजे.

**नफा-तोट्याचं विलीनीकरण**

विलीनीकरण हा सरकारच्या अधिकारातल्या खाजगीकरणसारखा विषय आहे. एसटी विलीनीकरणच्या निर्णयासाठी विधीमंडळाची मंजुरी आणि केंद्र सरकारची मान्यता आवश्यक आहे. कारण केंद्र सरकारच्या कायद्यानुसार आणि भाग भांडवलानुसार देशातल्या सर्व राज्यात त्या त्या राज्यांच्या एसटी सेवा सुरू आहेत. आपल्या एसटीचं राज्य सरकारी सेवेत विलीनीकरण करायचं असेल तर एसटी महामंडळाला केंद्र सरकारचं ३२०० कोटींचं भाग भांडवल परत द्यावं लागेल. ते घाट्यातल्या एसटी कसे शक्य आहे? मोदी सरकारने आपल्या अखत्यारीतल्या अनेक कंपन्या खाजगीकरणासाठी विकायला काढल्या. त्या कंपन्या फायद्यात होत्या. त्याचं खाजगीकरण होणं हे कामगारांच्या नुकसानीचं होतं आणि आहे. त्यामुळे कामगारांनी विरोध केला. तरीही सरकारी कंपन्यांचं खाजगीकरण झालंय. ते सरकारच्या फायद्यासाठीच झालंय. एसटीचं विलीनीकरण फायद्याचं असेल, तर ते राज्य सरकार केल्याशिवाय राहणार नाही. ते केलंच पाहिजे. पण हे विलीनीकरण संप लांबवून होणार नाही. अडीच महिन्यांच्या संपात १२०० कोटी रुपयांचा घाटा म्हणजे एसटीच्या नुकसानीत संपाचा मोठा वाटा! यापुढचा संपामुळे होणाऱ्या नुकसानीचा प्रत्येक रुपया विलीनीकरणाच्या शक्यतेला दूर लोटणारा असेल. विलीनीकरणासाठी एसटी फायद्यात असणं, आवश्यक आहे. खाजगी बँका गडगंज फायद्यात होत्या म्हणून इंदिरा गांधी सरकारने त्यांचे राष्ट्रीयीकृत बँकात विलीनीकरण केले होते. एसटी फायद्यात येण्यासाठी सरकारनेही कामगारांना शासकीय नोकरांच्या समकक्ष वेतन आणि इतर सोयी दिल्या पाहिजेत. त्यासाठी एसटी कामगारांनी हट्ट धरला पाहिजे. उत्पन्नात वाढ करून सरकारला जेरीस आणले पाहिजे.

**सावध ऐका पुढल्या हाका**

बीआयआर ॲक्ट रद्द करण्याच्या अनाठायी आग्रहाने गिरणी कामगारांची माती झाली, तीच गत विलीनीकरणाची मूठ वळवणाऱ्या एसटी कामगारांबरोबरच एसटी सेवेचीही होईल! गिरणी संप लांबवण्यासाठी ज्यांनी डॉ. सामंत यांना जंगी सभा-भाषणांसाठी आणि कामगारांना रेशनसाठी हस्ते-परहस्ते मदत पोचवली, त्यांचेच मॉल-टॉवर संपामुळे गिरण्यांच्या मोकळ्या झालेल्या जमिनीवर उभे राहिले आहेत. देशातल्या मोठमोठ्या मीडिया हाऊसची कार्यालयं, स्टुडिओ मुंबईत गिरण्यांच्याच मोकळ्या झालेल्या जमिनींवर आहेत. आता एसटी संपाला बुस्टर डोस' देण्याच्या सुपाऱ्या सोशल मीडियावालेही वाजवत आहेत. मुंबई, ठाणे, पुणे आणि बहुतेक शहरातल्या मोक्याच्या जागेवर एसटीचे मोठे डेपो आहेत. त्या जमिनीवर लक्ष असणारे, विलीनीकरणाच्या आग्रहासाठी भाषण-राशनची व्यवस्था करत आहेत का, त्याची तपासणी एसटीची हालत ठाऊक असणाऱ्या कामगारांनी केल्यास, नोकरी टिकवून विलीनीकरणासाठी संघर्ष करण्यात शहाणपणा असल्याचं त्यांच्याही लक्षात येईल. हमसे जो टकरायेगा, मिट्टी मे मिल जायेगा,' अशा घोषणा देणारेच मातीत गेलेत. हा इतिहास डंके की चोट पर' कुणीही सांगणार नाही! एसटी कामगारांनो, वेळीच सावध व्हा. संपात संपलेला मुंबईचा गिरणी कामगार होऊ नका.

(लेखक चित्रलेखा या नामांकित साप्ताहिकाचे संपादक आहेत.)

# विषमतेचा चक्रव्यूह भेदणार कसे?

**भारतात १० टक्के लोकांकडे ५७ टक्के संपत्ती आहे आणि तळातल्या लोकांकडे फक्त १३ टक्के संपत्ती आहे. उपभोगासाठी लोकांच्या खिशात पैसाच नाही. त्यामुळे त्यांच्याकडून मागणी नाही. मागणी नसल्यामुळे गुंतवणूक नाही आणि परिणामी मंदीसदृश स्थिती निर्माण झालीय. बेरोजगारी, गरिबी, भाववाढ आणि विषमता असा हा समस्यांचा चक्रव्यूह आहे.**

सायमेन कुझनेट्स हे अमेरिकन अर्थतज्ज्ञ होते. त्यांना १९७१चं अर्थशास्त्रातलं नोबेल पारितोषिक मिळालं होतं. १९५५ला त्यांनी इकॉनॉमिक ग्रोथ अँड इन्कम इनइक्वॅलिटी' हे जे व्याख्यान दिलं, ते विलक्षण गाजलं. त्यात कुझनेट्स यांनी खासगी भांडवलदारी व्यवस्थेत केवळ सुरवातीला सामाजिक विषमता वाढते आणि काही काळानंतर संपत्तीच्या देवाणघेवाणीतून आर्थिक समता अस्तित्वात येते, असा सिद्धांत मांडला होता.

कुझनेट्स यांनी सामाजिक आणि



वैयक्तिक संपत्तीच्या आकडेवारीचा अभ्यास केला होता. उच्चवर्गाचा आर्थिक उत्पन्नात आणि संपत्तीत वाटा, हा त्यांचा शोधनिबंध १९५३ला प्रकाशित झाला होता. पण खासगी भांडवलदारी व्यवस्थेत सामाजिक संपत्ती थोड्याच भांडवलदारांच्या हातात येऊन विषमता वाढत जाते आणि शेवटी भांडवलदारी व्यवस्था संपुष्टात येते, असा विचार मार्क्सने मांडला होता. मार्क्सच्या बरोबर विरुद्ध कुझनेट्स यांचा सिद्धांत होता. जगातून मार्क्सवादी राजवटींचा शेवट होऊन तीन दशकं लोटली असली,

**अर्थकारण**

**हेमंत देसाई**

तरी मार्क्सने विषमतेबद्दल जे मत मांडलं, ते कसं योग्य होतं, हे आजही दिसून येतं. जगभरात गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाचा कहर सुरू असून त्यामुळे करोडो लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. ऑक्सफॅम संस्थेने एक अहवाल प्रसिद्ध केला असून, त्यात भारतातल्या वाढत्या आर्थिक विषमतेबद्दल चिंता व्यक्त करण्यात आलीय.

**विषमतेचं वास्तव मांडणारा अहवाल**

२०२१मधे ८४ टक्के सामान्यजनांच्या उत्पन्नात घट झाली असून अब्जाधीशांची संख्या पण १०२ वरून १४२ वर जाऊन पोचलीय. (क्रमशः)


आधुनिक विचारांचे
# वर्तमान

## डॉ.क्रांती शिरसाट राज्यात अव्वल



अंबाजोगाई : येथील डॉ.क्रांती महादेव शिरसाट ही केंद्र शासनाच्या वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या नीट पीजी परीक्षेत मागासवर्गीय प्रवर्गातून देशात ११ वी तर महाराष्ट्रातून पहिली आली आहे.केंद्र सरकारच्यावतीने वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशपूर्व नीट पीजी ही परीक्षा घेतली जाते. नुकताच या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यात डॉ.क्रांती शिरसाट ही मागासवर्गीय प्रवर्गातून देशात ११ वी तर महाराष्ट्रातून पहिली आली आहे. डॉ.क्रांती हिचे एमबीबीएसचे शिक्षण मुंबईच्या लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालयातून झाले होते.





# सुपर मार्केटमध्ये वाईन तर शेतकऱ्यांनी गांजा लावायला हरकत नाही

## शेकाप नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांची सरकारकडे मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : महाराष्ट्र शासनाने सुपर मार्केटमध्ये वाईन विकण्यास परवानगी दिली असल्याने असल्याने शेतकऱ्यांसह सर्वसामान्य व्यक्ती संभ्रमात पडला आहे. शासनाला तळीरामांची संख्या वाढवायची आहे काय ? असा प्रश्न निर्माण होतो आहे. जर गल्लीबोळातील सुपर मार्केटमध्ये वाईन उपलब्ध ठेवण्याची परवानगी द्यायची असेल तर शेतकऱ्यांना ही राजरोस गांजा, अफू लावायला परवानगी द्या, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी केली.



सद्यस्थितीत राज्य शासनाचे तरुण पिढी बरबाद होत असताना शिक्षण व्यवस्थेकडे दुर्लक्ष होत असून वाईन विकण्याच्या नवनवीन शक्कल लढवून शासन प्रत्येक माणसापर्यंत वाईन कशी पोहोचेल याचा आटोकाट प्रयत्न करत असताना सुपर मार्केटमध्ये वाईन विकण्यास परवानगी दिल्याने सर्वसामान्य व्यक्ती आणि शेतकरी संभ्रमात पडला आहे.

शासनाच्या तिजोरीत भर पडण्यासाठी जर शासन गल्लीबोळातील सुपर मार्केटमध्ये वाईन विकण्यास परवानगी देणार असेल तर निबंध शेतकऱ्यालाच कशाला लावता शेतकऱ्यांनाही गांजा, अफू लावण्यास परवानगी द्या, अशी मागणी करताना हे सरकार मोघलाईचे आहे काय? असा सवाल विचारत शेतकरी व शेतीशी संबंधीत शासनाच्या या चुकीच्या धोरणाविरुद्ध शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आक्रमकपणे लढा उभारू, असे शेतकरी कामगार पक्षाचेनेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी म्हटले आहे.


# बीड जिल्ह्यातही संविधान स्तंभ उभारा

## कास्ट्राईब संघटनेची पालकमंत्र्यांकडे मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : नागरीकांमध्ये संविधानाप्रती आदर निर्माण होऊन आपले हक्क आणि कर्तव्यांबद्दल जाणीव जागृती व्हावी तसेच संविधानाची मूल्ये विकसित होण्यासाठी बारामतीप्रमाणे बीड जिल्ह्यातही संविधान स्तंभ उभारावेत अशी मागणी माजलगाव कास्ट्राईबने बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे केली आहे.

खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून व प्रेरणेतून बारामती लोकसभा मतदार संघातील सर्व कार्यालयाच्या परिसरात संविधान स्तंभ उभारले जात असल्याचा व्हिडिओ सध्या संबंध राज्यभरात विविध प्रसार माध्यमांतून प्रसारीत होत आहे.त्याच अनुषंगाने बीड जिल्ह्यातही अशा प्रकारे संविधान स्तंभ सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय परिसरात उभारले जावेत अशी मागणी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने राज्याचे सामाजिक न्याय व विशेष विभाग मंत्री तथा जिल्ह्याचे लोकप्रिय पालकमंत्री




धनंजय मुंडे यांच्याकडे ई-मेल द्वारे करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नवोपक्रमाबरोबरच सामाजिक न्याय विभागामार्फत अनेक विकासात्मक कामे राबविण्यात अग्रेसर असल्याने त्यांनी हा उपक्रम संपूर्ण बीड जिल्ह्यात राबवला तर आपल्याही नागरीकांमध्ये संविधानाप्रती आस्था निर्माण होऊन त्यांना आपल्या संविधानिक कर्तव्य व हक्कांची जाणीव होण्यासाठी उपयुक्त ठरेल.

पालकमंत्री यांनी हा उपक्रम हाती घेऊन सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय परिसरात संविधान स्तंभ उभारण्याच्या कामाला प्राधान्याने गती द्यावी अशी मागणी ई-मेलद्वारे कास्ट्राईबचे जिल्हा संघटनप्रमुख भारत टाकणखार, जिल्हा उपाध्यक्ष वसंत टाकणखार, माजलगाव तालुका सचिव अभिमन्यु इबिते, तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार, किरण शिंदे, निलेश गावडे, रणजित राठोड, नारायण भाळशंकर, अजिमोद्दीन खतीब, धोंडीराम रामुळे,मनोहर कटारे, जीवन डोंगरे, शेख जहीर, शिवाजी भाळशंकर, किरण माने, सय्यद आय्युब, अमित वाघमारे, राजकुमार सोनवणे, कृष्णा हौसरमल, नागनाथ पडलवार, विश्वनाथ बेद्रे, अविनाश येळंबकर, प्रतीक स्वामी, नितीन गायसमुद्रे, प्रविण जाधव, शेख आसद, सुमेध घाडगे, शंकर पवार, बळीराम घणघाव, शिवाजी व्यवहारे, गोविंद पवार, श्रीकांत जाधव, राजेंद्र सातपुते, मारोती शहापूरकर,अमोल राऊत, राहुल खुणे, नितीन पुटवाड, हनुमंत पांढरपोटे,शेख मतीन,अनिल गावित,लक्ष्मण पोटभरे, रवी आदमाने व विजय वैरागे आदींनी केली आहे.

# आसाराम कांदे यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ

▶ प्रतिनिधी

माजलगाव : उस्मानाबादी शेळी संगोपनासाठी काम करणारे अभ्यासक तथा पत्रकार आसाराम कांदे यांच्या निधनामुळे तेलगाव, दिंद्रुड परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



तालुक्यातील चोपनवाडी येथील आसाराम कांदे हे शुक्रवारी रात्री धारूरहून चोपन वाडीकडे मोटार सायकलवरून जात असताना तेलगाव येथील माजलगाव साखर कारखान्या जवळ अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाले. डोक्याला व दोन्ही पायांना मार लागल्याने त्यांच्यावर बीडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना रात्रीच त्यांचे निधन झाले. शनिवार, दि.२९ जानेवारी रोजी चोपनवाडी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. चोपनवाडी येथील आसाराम कांदे यांनी गेल्या पंधरा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात काम करताना त्यांनी दैनिक लोकनेता, लोकजगत बरोबरच वार्ताहर म्हणूनही काम केले आहे. पाणलोट क्षेत्र, शेळी पालनासह विविध प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून बेरोजगारांना रोजगाराच्या संधीही आसाराम कांदे यांनी उपलब्ध करून दिल्या होत्या.

आसाराम कांदे हे शुक्रवारी रात्री आठच्या दरम्यान धारूरहून चोपनवाडीकडे मोटार सायकलवरून जात असताना तेलगाव येथील माजलगाव सहकारी साखर कारखान्याजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या मोटारसायकलला जोराची धडक दिल्याने कांदे यांच्या डोक्याला व दोन्ही पायांना गंभीर मार लागला. त्यांना उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान रात्रीच त्यांचे निधन झाले. त्यांच्यावर शनिवार दि.२९ जानेवारी रोजी चोपनवाडी येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, भाऊ असा परिवार आहे. कांदे यांच्या निधनाबद्दल 'वर्तमान'तर्फे बाबा श्रीहरी देशमाने, भगीरथ तोडकरी यांनी श्रध्दांजली अर्पण केली आहे.







राजेश्री मुळाटे, कु.जिज्ञासा बनसोडे यांनी आंतरजालीय अभासीपणे सादर झालेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडासाठी घरी रेखाटलेली लक्षवेधी रांगोळी.

# मराठी भाषा संवर्धनासाठी व्यापक प्रयत्नांची गरज

## साहित्यिका मृणालिनी कानिटकर यांचे उद्‌गार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : कोरोना काळात प्रत्यक्ष विद्यार्थी शाळेत नसले तरीही महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात झालेला दूरदृश्य प्रणालीतील मराठी भाषा संवर्धन पंधरवडा हनूमंत चांदगुडे आणि समारोपाच्या कार्यक्रमात पुणे येथील मृणालिनी कानिटकर या दोन साहित्यिकांशी झालेला संवाद आणि मार्गदर्शनाने मुलेमुली हरखुन गेली. दरम्यान, मराठी भाषेच संवर्धनासाठी व्यापक प्रयत्न करण्याची गरज असल्याचे उद्गार साहित्यिका मृणालिनी कानिटकर यांनी काढले.



अतिशय नियोजन पुर्वक झालेल्या उपक्रमांना मुख्याध्यापक कवी प्रभाकर साळेगावकर यांनी मार्गदर्शन केले. आपल्या कविता सादर करुन मुलांच्या प्रश्नाला उत्तरे देताना ख्यातनाम कवी हनुमंत चांदगुडे म्हणाले, संवेदन रूजलं की कविता जन्म घेते जसं काळ्यामातीत राबलो की पीक तरारून येतं म्हणुन लिहीते व्हा, गुरूजी पेरते झालेत बाळांनो तर प्रसिद्ध साहित्यिक मृणालिनी कानिटकर म्हणाल्या, बाळांनो.. तुम्ही भाग्यवान आहात की, महात्मा ज्योतिबा फुले या शाळेत तुम्ही शिकत आहात.विद्यार्थी समुहावर दररोज तुका आकाशा ऐवढा ..या सदरात अभंगाची माहिती, अनेक आकर्षक भित्तिपत्रिका, ध्वनी मुद्रीकेतुन कविता, जाहिरात, साहित्यिक परीचय, म्हणी व त्याचे अर्थ, जात्यावरील ओवीचे, बोलीतील शब्दांचे संकलन, कोरोनाचा प्रभाव असतानाही संधी मिळेल तेव्हा विद्यालयास चिमुकल्यांनी भेट दिलेल्या ग्रंथाचे प्रदर्शन, माजी विद्यार्थी व शिक्षक साहित्यिक बालाप्रसाद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेले कवीसंमेलन, अनुवाद, ध्वनीचित्र मुद्रणातुन मराठी गिते, ओव्या यांचे वेशभूषेतील सादरीकरण, सुंदर हस्ताक्षर दर्शन, निबंध लेखन या विविध उपक्रमात वेगवेगळ्या रूपात २०० हुन ५ वी ते ९ वीचे विद्यार्थी सहभागी झाले. या काळात समन्वयक म्हणुन भूमिका करणारे शिक्षक हिमांशु देशमुख यांनी मराठीची विविध उत्तुंग शिखरे चिमुकल्यांच्या पुढ्यात दिली. अर्चना भाले, कवी प्रविण काळे, गौरी देशमुख, राजेश्री मुळाटे यांच्या विशेष परिश्रमामुळे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा आकर्षक झालेला आहे. पर्यवेक्षक मोरेश्वर मसलेकर, संतोष जोशी, कवी सुमंत गायकवाड, ओमप्रकाश दायमा, अभय राठोड, राजाभाऊ शिवणकर, रमेश गिरी, यांचे संयोजन सहाय्य, सहभागामुळे माय मराठीचा संवर्धन पंधरवडा आनंददायी झाला. या सर्व उपक्रमाबद्दल विद्यार्थी व शिक्षक यांचे संस्थेचे अध्यक्ष सितारामजी शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख, उपाध्यक्ष रंगराव भिलेगावकर, संचालक अनिलराव मोगरेकर, र.ब.देशमुख, शिरीष देशमुख, सचिन देशमुख यांनी अभिनंदन केले आहे. समन्वयक हिमांशू देशमुख यांनी मान्यवर पाहुणे सर्व सहकारी यांचे आभार व्यक्त केले.

# वाल्मिक कराड यांचा वाढदिवस धार्मिक कार्यक्रमांनी साजरा

▶ प्रतिनिधी

सिरसाळा : बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय, परळी नगरपरिषदेचे गट नेते तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य वाल्मिक कराड यांचा वाढदिवस परळी मतदारसंघात अनेक ठिकाणी राष्ट्रवादी पक्ष कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. सिरसाळ्यात राष्ट्रवादीच्या महिला तालुकाध्यक्ष कल्पना राम आघाव व कुटुंबीयांनी आगळ्या वेगळ्या पद्धतीने धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे तीन दिवसीय आयोजन करून कराड यांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना केली. तीन



दिवस भजन व स्वामी चरित्राचे वाचन कार्यक्रम आयोजित केला होता. रविवार रोजी महाप्रसादाचे आयोजन केले.

भजन व स्वामी चरित्र वाचणास मोठा प्रतिसाद नागरिकांतून मिळाला आहे. सिरसाळ्यात प्रथमच अशा पद्धतीने राजकिय नेत्याचा वाढदिवस एवढ्या चांगल्या पद्धतीने आयोजित केला होता. ह्या कार्यक्रमाची गावभर स्तुती पर चर्चा झाली व कराड यांना शुभेच्छा व्यक्त झाल्या आहेत. भजन कार्यक्रमात दत्ता महाराज सोनवने, आबा कडभाने, शाम काळे, वैभव देशमुख, विश्वाभंर देशमुख, रूपनर मामा, कांडके मामा, कान्होपात्रा सोळंके, कमलाबाई कडबाने, राऊत बाई, कुंभार, मिराबाई केदार, सुनिता चव्हाण, मंदा चव्हाण, लहाने बाई, लक्ष्मीबाई चव्हाण, लक्ष्मी कावरे आदीसह अनेकजण उपस्थित होते.

# डॉ.राजदिप देशमुख सेट परिक्षा उत्तीर्ण

▶ प्रतिनिधी

माजलगाव : सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील उपप्राचार्य रावसाहेब देशमुख यांचे चिरंजीव डॉ.राजदिप देशमुख यांनी सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांचा वतीने सहाय्यक प्राध्यापक पदासाठी घेतल्या जाणाऱ्या पात्रता (सेट) परीक्षेत इंग्रजी विषयात यश संपादन केले. डॉ.राजदिप यांची इंग्रजी विषयात पीएचडी झालेली आहे. हैदराबाद येथील पदवी अभ्यासक्रमातही त्यांचा एक घटक समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सत्कार करण्यात आला.



## दीपक तोडकरी यांचे अभिष्टचिंतन!



माजलगाव : 'वर्तमान'चे व्यवस्थापकीय संचालक दीपक तोडकरी यांचा वाढदिवसानिमित्त गौरव करताना महेश बोटवे, आदित्य धारक, ईश्वर स्वामी, गणेश तोडकरी, रवि जाधव, विशाल होके, समीर वखरे, वरद शेटे, गौरव होके, अजय काटकर आदी.

# मतदान हक्काबाबत हवी जनजागृती : वर्षा मनाळे

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मतदानाच्या हक्काबाबत हवी जनजागृती असल्याचे प्रतिपादन माजलगावच्या तहसीलदार वर्षा मनाळे यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कनिष्ठ विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष प्रकाश दुगड तसेच मंचावर गटशिक्षणाधिकारी एल.बी.बेडसकर स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह अमरनाथ खुर्पे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड उपस्थित होते. पुढे बोलताना तहसीलदार वर्षा मनाळे म्हणाल्या, की २५ जानेवारी १९५० रोजी भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना झाली. म्हणून हा दिवस देशभर राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. टी.एन.शेषण हे जेव्हा निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहत होते तेव्हा त्यांनी मतदान प्रक्रियेमध्ये चालणाऱ्या सर्व मालप्रॅक्टिसेस बंद करून मतदान प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्याचे काम केले. त्यानंतर सर्व भारत भर दरवर्षी सप्टेंबर महिन्यापासूनच मतदार पुर्ननिरीक्षणाचा कार्यक्रम सर्वत्र चालतो. आपण कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये. मतदान करताना शांत संयम व सद्सद्विवेकबुद्धी चा वापर करून योग्य उमेदवारास आपण मतदान करावे. व १८ वर्षे पूर्ण झाल्यावर प्रत्येक भारतीय नागरिकाने आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवली पाहिजे व मतदानाचा हक्क आपण बजावला पाहिजे. बऱ्याच वेळा या दिवशी सार्वत्रिक सुट्टी असल्यामुळे लोक मतदान न करता पर्यटनस्थळी फिरायला जाणे किंवा घरी राहून सुट्टीचा आनंद साजरा करणे असे करत असतात. यापेक्षा सरकारने खरे तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आपल्याला सार्वजनिक सुट्टी दिलेली असते. जर शंभर टक्के मतदान झाले तर



योग्य उमेदवार निवडून आल्याशिवाय राहत नाही असेही त्या म्हणाल्या. म्हणून मतदानाचे कर्तव्य प्रत्येकाने बजावलेच पाहिजे.गटशिक्षणाधिकारी एल.बी.बेडसकर म्हणाले की प्रशासनाच्या जागृतीची मोहीम उपलब्ध करून देण्याची ही एक संधी आहे. मतदानाच्या प्रक्रियेमधून आपण आपले विचार, मत योग्य उमेदवार निवडून बजावू शकतो. आपले मत हे बहुमोल असते. एकेका मताला मतदान प्रक्रियेमध्ये खूप महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून आपण या प्रक्रियेपासून कधीही वंचित राहू नये निवडणुकीच्या काळामध्ये केलेल्या आर्थिक व्यवहारा पासून आपण दूर राहिले पाहिजे. तरच पारदर्शक उमेदवार निवडला जाईल.


महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड म्हणाले की भारत महासत्ता करण्यासाठी तुमच्या सर्व युवकांची साथ या देशाला हवी आहे. आज शिक्षित मतदारांची खूप मोठी आवश्यकता आपल्या देशासाठी आहे. मतदानाच्या या प्रक्रियेमध्ये आपण जर सद्सद्विवेक बुद्धीने काम करून आपला सहभाग नोंदवला तरच खऱ्या अर्थाने या देशांमध्ये चांगली लोकशाही नांदेल व चांगल्या विचारसरणीचे सरकार येऊन लोकांच्या कल्याणाचे लोककल्याणकारी निर्णय घेतले जातील. म्हणून प्रत्येक व्यक्तीने या मतदानाच्या प्रक्रियेपासून वंचित राहू नये.अध्यक्षीय समारोप करताना प्रकाश दुगड म्हणाले की भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे. या देशांमध्ये मतदान प्रक्रियेला फार मोठे महत्त्वाचे स्थान आहे. घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानद्वारे जी मूल्ये आपल्यामध्ये रुजवली आहेत. त्या मूल्यांचा विचार जर केला तर खरोखरच आपण मतदान प्रक्रियेमध्ये चांगले काम करून या देशाला एक भक्कम व चांगल्या विचारसरणीचे सरकार देवू शकतो. मग ते सरकार आपल्या देशांमध्ये असणारे वेगवेगळे प्रश्न तात्काळ सोडवेल तसेच परकीय दुश्मनापासून देखील आपल्या देशाला वाचूवू शकेल. म्हणून मतदान करताना सद्सदविवेक बुद्धीने मतदान केले पाहिजे असे ते म्हणाले. याप्रसंगी महाविद्यालयात मतदार दिवसाचे औचित्य साधून प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ह्या स्पर्धा महाविद्यालयात अत्यंत उत्साहात पार पडल्या. निबंध स्पर्धेमध्ये राजश्री दिलीप बोबडे हिचा प्रथम क्रमांक तर प्राची लक्ष्मणराव बर्डे हिचा द्वितीय क्रमांक आला. तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये विजय झालेल्या गटातील विद्यार्थ्यांची नावे याप्रमाणे होती. अतुल विघ्ने, दिगंबर शिंदे, नकुल नाईकनवरे, अथर्व शिंदे, अरिहंत ललवाणी, मंगेश होके, अनिकेत ठोंबरे, ओमकार गवारी, प्रतिक फपाळ, अनमोल कांबळे, भागवत शिंगणे, शेख फारुख या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. कार्यक्रमाची सुरुवात वैयक्तिक पद्याने करण्यात आली. वैयक्तिक पद्य प्रा.अंकुश साबळे यांनी सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. युवराज मुळ्ये यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.राघवेंद्र मुळी यांनी तर आभार उपप्राचार्य संतोष लिंबकर यांनी मानले. या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन होन्ना, कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रेम राठोड, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापिका व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# रेल्वेप्रश्नी बीडकरांची स्वप्नपूर्ती!

## रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

▶ प्रतिनिधी

बीड : फेब्रुवारीच्या पहिल्याच आठवड्यात आष्टी ते मुंबई नियमित रेल्वे धावणार आहे. या रेल्वेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, खासदार डॉ.प्रितम मुंडे, पंकजा मुंडे यांच्या हस्ते ऑनलाइन उद्घाटन होणार आहे, अशी माहिती रेल्वेच्या सूत्रांकडून समजली आहे.






बीड जिल्ह्यात नगर-परळी रेल्वेचे काम वेगात सुरू आहे. दरम्यान, आष्टी ते नगर ६० किमीचे काम पूर्ण झाले आहे. याची चाचणी देखील यशस्वी झाली आहे. आता ४ फेब्रुवारीच्या दरम्यान हे उद्घाटन होणार असल्याची माहिती आहे. अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्ग २६१ किलोमीटरचा असून गेल्या अनेक दिवसांपासून हा प्रश्न रखडला होता. रेल्वेमुळे औद्योगिक वसाहती निर्माण होण्यात मोठ्या अडचणी होत्या. शिवाय बीड जिल्ह्यात उत्पादित झालेला शेतमाल किंवा इतर कच्चामाल परराज्यात किंवा परजिल्ह्यात नेण्यासाठी रेल्वे नसल्याने मोठी अडचण होत होती. १९९५ साली या नगर बीड परळी रेल्वेमार्गला तत्वतः मंजुरी मिळाली होती. मात्र, त्यानंतर अनेक वर्ष राजकीय इच्छाशक्ती अभावी या मार्गाचे काम रखडले. दरम्यान, दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी रेल्वे मार्गासाठी भरभरून योगदान देत पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून या मार्गासाठी भरीव निधीची तरतूद केली.



# शिवसंवाद अभियानातून जाणून घेतल्या शेतकऱ्यांच्या व्यथा

## बांधावरच्या सामान्य माणसांची आसवे पुसणे शिवसेनेचे आद्यकर्तव्य : अप्पासाहेब जाधव

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शिवसंवाद अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. दरम्यान, बांधावरल्या सामान्य माणसांची आसवे पुसणे हे शिवसेनेचे परम कर्तव्यच आहे, असे उद्गार विविध ठिकाणी जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी काढले.



हिंदू हृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित शिवसंवाद अभियान टप्पा २ अंतर्गत गाव पातळीवर भेट दरम्यान आज सरवर पिंपळगाव, पिंपळगाव वसाहत, सोमठाणा,आडोळा, आबेगाव, छत्रबोरगाव, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत चर्चा केली असता या कार्यक्षेत्रात अजून ९० टक्के ऊस शिल्लक आहे. तसेच नोंद असूनही ऊस बांद्यावर उभा आहे अशा समस्या जाणून घेऊन उद्या जय महेश शुगर इंडस्ट्रीजचे शेतकी अधिकारी आणि उपाध्यक्ष यांच्याशी शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव हे सविस्तर चर्चा करणार आहेत. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव म्हणाले की, कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उभा असताना कारखान्याचे कर्मचारी हे गेटकींग घ्या माध्यमातून ऊस आणत असतील तर कार्यक्षेत्रा बाहेरील एकही टिपरु ऊस कारखान्यात गाळपासाठी शिवसेना आणू देणार नाही. तसेच शेतकऱ्यांच्या ऊस लागवड नोंदणी बाबतीत कारखान्याच्या प्रशासनाची चर्चा करणार आहेत. कारखानदारांनीही आपल्या प्रशासनाशी चर्चा करुन गाळपाची गती वाढवण्याबरोबरच ऊस गाळपाचे योग्य नियोजन केल्यास हा प्रश्न सुटू शकेल. यावेळी उपतालुकाप्रमुख अतुल उगले, चेअरमन गोरे, कल्याण बल्लाळे, सरवर पिंपळगाचे सरपंच, सुखदेव धुमाळ, संभाजी पास्टे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख राहुल सुरवसे, गावकरी आणि शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. तरी उद्या ऊस प्रश्नावर सर्व शेतकरी, शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक, युवासैनिक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन माजलगाव शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान, ठिकठिकाणी झालेल्या शिवसंवाद अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला.

### गौरव सोहळा



अंबाजोगाई : बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार यंदा पंडीत पुष्पराज कोष्टी यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी पंडीत उध्दवबापू आपेगावकर आणि परिवार.

### सन्मान सेवापूर्तीचा!



दिंद्रुड : शिस्तप्रिय मुख्याध्यापक, प्राचार्य बी.एन.देशमाने यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव करताना सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ चांदमारे, भालचंद्र ढगे, संपादक बाबा श्रीहरी देशमाने, पत्रकार अतुल चांदमारे.

### सामाजिक बांधिलकी



पात्रुड : प्रजासत्ताक दिनानिमित्त पात्रुड येथील जिल्हा परिषद शाळेला वॉटरफिल्टर भेट देताना सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ चांदमारे, सरपंच ॲड.कजिम मनसबदार समवेत शिक्षकवृंद. दरम्यान, पंचक्रोशीतील आणखी तीन शाळांनाही वॉटरफिल्टर भेट दिले.

# शिवसेना वैद्यकीय कक्षामुळे झाली सुमितच्या मेंदुची शस्त्रक्रिया

▶ प्रतिनिधी

उस्मानाबाद : वैद्यकीय सेवेसाठी तत्पर असलेल्या शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या सहाय्यामुळे परांडा तालुक्यातील येणेगाव येथील सुमित नाईकनवरे युवकाच्या मेंदुची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.



महाराष्ट्राचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या शिवसेना वैद्यकीय मदत कक्षामार्फत राज्यातील शेकडो गरजवंत रूग्णांना लाभ मिळत आहे. परांडा तालुक्यातील येणेगाव येथे सुमित नाईकनवरे यांच्या घरची परिस्थिती बिकट असल्याने शस्त्रक्रियेचा खर्च पेलू शकत नव्हते नाईकनवरे यांनी आपणास शस्त्रक्रियेसाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाशी संपर्क साधून मदतीची विनंती केली. त्यानुसार शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाने सुमित नाईकनवरे यांची मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी मदत केली. या शस्त्रक्रियेसाठी तीन लाख रूपये खर्च आला. त्यात कक्षामार्फत एक लाख रूपयांचे मदत झाली. केलेल्या मदतीबद्दल सुमित च्या कुटुंबियांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, ॲड.कानिफ कानतोडे, यांच्यासह टीमचे धन्यवाद मानले.

# अतिक्रमणे काढा आणि महापुरूषांचे पुतळे उभारा

## कृष्णा कानडे यांची परिवहन मंत्र्याकडे मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील नवीन बसस्थानक परिसरातील अतिक्रमणे काढा आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभरा तसेच जुने बसस्थानक परिसरातील अतिक्रमणे काढून तेथे भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा प्रभू श्रीरामचंद्र प्रतिष्ठाणचे अध्यक्ष कृष्णा कानडे यांनी राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित, दिनदुबळ्या समाजाला स्वाभिमानाने जगण्याचे अधिकार दिले. माजलगाव शहरात या दोन्ही महापुरुषांचे पुतळे उभारणे गरजेचे आहे, असेही कानडे यांनी निवेदनात म्हटले आहे.

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे..

## निमित्त 'वर्तमान'च्या वर्धापनदिनाचे जागर वृक्षसंवर्धनाचा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे... पक्षीही सुस्वरे आळविती' या ओळीप्रमाणे 'आधुनिक विचारांचे वर्तमान'च्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त वृक्षसंवर्धनाचा जागर करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते तथा 'वर्तमान'चे प्रतिनिधी महेश बोटवे यांच्या पुढाकारातून वृक्षारोपण करण्यात आले.

'वर्तमान'च्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून माजलगाव शहरातील श्रीसाई मंदीर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बंजारानगर शाळेच्या प्रांगणात २६ जानेवारी रोजी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सहशिक्षक रामसतिष जोगदंड, शेख बिबन, महेश बोटवे, दीपक तोडकरी, विशाल होके, संजय कर्डिले, बालु आवटे, संजय कारळकर, संतोष मोगरकर, राहूल मेंडके, आसाराम दराडे, शशिकांत दराडे उपस्थित होते. यावेळी महेश बोटवे यांनी वृक्षारोपणाबाबत महत्त्व विशद करून 'वर्तमान'च्या टीमला वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

वर्तमानच्या वतीने वर्धापन दिनानिमित्त राबवण्यात आलेल्या या वृक्ष लागवड चळवळीचे अनेकांनी कौतुक करण्याबरोबरच वृक्ष लागवडीसाठी पुढाकार घेतला.

**वृत्तपत्र रोपट्याला हवे संगोपनाचे पाठबळ : जोगदंड**

'वर्तमान' या नावाने लावलेलं एक छोटसं रोपटं चौथ्या वर्षात प्रदार्पण करत आहोत. ही भूषणावह बाब आहे. कोणतीही वृत्तपत्र चळवळ यशस्वी होण्यासाठी वाचकांचे पाठबळ लागते. जाहिरातदारांचा हातभार लागतो. तो वर्तमानला मिळाला आहे, असे गौरवोद्गार सहशिक्षक रामसतिष जोगदंड यांनी काढले.








आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.


मा.चंद्रकांतजी शेजुळ साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
---* शुभेच्छुक *---
कल्याण आबुज
सभापती (समाजकल्याण)
प्रा.प्रकाश गवते
रामप्रभू साळुंके
ॲड.शरद चव्हाण
जिल्हा परिषद, बीड


मा.चंद्रकांतजी शेजुळ साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
----* शुभेच्छुक *----
सौ.सोनाली खुळे
भागवतराव खुळे
डॉ.वसिम मनसबदार
◆ पंचायत समिती माजलगाव ◆


मा.चंद्रकांतजी शेजुळ साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
जयदत्त (आण्णा) नरवडे
मा.सभापती, पंचायत समिती माजलगाव


माजलगाव तालुका पतसंस्था फेडरेशनचे मार्गदर्शक
तथा तुळजाभवानी अर्बनचे संस्थापक अध्यक्ष
चंद्रकांतजी शेजुळ साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा !
* शुभेच्छुक *
सतिष सावंत
संस्थापक अध्यक्ष
अनंत शेंडगे
संजय सपाटे
सचिव
व सर्व संचालक मंडळ, सदस्य
माजलगाव तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.माजलगाव
ता.माजलगाव जि.बीड


मा.चंद्रकांतजी शेजुळ साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिकशुभेच्छा..!
शुभेच्छुक
गणेश तौर
सचिव
निवृत्ती (आण्णा) सोळंके
अध्यक्ष
सर्व सन्माननीय संचालक मंडळ खरेदी विक्री संघ, माजलगाव


मा.चंद्रकांतजी शेजुळ साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
दयानंद स्वामी
कचरू खळगे
राष्ट्रवादी काँग्रेस पाटी, माजलगाव


मा.चंद्रकांतजी शेजुळ साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
◆ मा.नगराध्यक्ष, नगरसेवक नगर परिषद माजलगाव ◆


मा.चंद्रकांतजी शेजुळ साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिकशुभेच्छा..!
शुभेच्छुक
सचिन पट्टेकर
तुळजाभवानी कन्स्ट्रक्शन्स अँण्ड डेव्हलपर्स, माजलगाव